# SAVITRIBAI PHULE TEACHERS ASSOCIATION

S.P.T.A.

Registration No. MH/1305/2021



Geeta Shinde
President

Satish Pardeshi
Vice-President

Dhananjay Meshram
Vice-President

Deepak Garud
Secretary

Shraddha Kumbhojkar
Joint-Secretary

Rajesh Gachche
Treasurer

Vikas Mathe
Treasurer

Executive Members

Rajendra Maske

Varsha Wankhede

Navanath Tupe

Aashish Dongre

Raju Ghode

Talat Praveen


Outward No.: 20/29/22

दिनांक २९/०८/२०२२.

प्रती,

मा. कुलसचिव,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

पुणे ४११००७.

विषय : वाहतूक नियंत्रणाबाबत....

महोदय,

१) दि. १ जानेवारी २०२२ पासून सेनापती बापट रस्ता, गणेशखिंड रस्ता तसेच पाषाण व बाणेर रस्ता यावरून विद्यापीठात येण्यासाठी राजभवन जवळ वळण रस्ता (U turn) घ्यावा लागतो. प्रस्तावित पुणे मेट्रोच्या कामासाठी हि व्यवस्था केली आहे. या रस्त्याने शेकडो प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी येत असतात. कोविड काळानंतर आता सर्वकाही सुरळीत चालू झाल्याने या रस्त्यावरील गर्दी प्रचंड वाढली आहे. तसेच औंध कडून होणारी वाहतूकही खूप मोठ्या प्रमाणात आहे. सर्व प्रकारची दुचाकी ते जड, अवजड वाहने औंध रस्त्यावरून विद्यापीठ चौकाकडे येत असतात. कार्यालयीन वेळेत ९ ते ११ हि गर्दी खूपच जास्त असते. अशा परिस्थितीत राजभवनाजवळील वळण (U turn) हे अत्यंत धोकादायक ठरू शकते. वळण घ्यायचे म्हटले तरी ते कसरतीचे व जीवावर बेतून घ्यावे लागते. औंध कडून येणारी वाहने हे वळण इतरांना घेऊ देऊ इच्छित नसतात किंवा वाहने मध्ये घुसू देत नाहीत. यामुळे जीव मुठीत धरून आम्हाला येथून यावे लागते. हि अतिशय गंभीर समस्या आहे. तिथे जर कायम एक पोलीस कर्मचारी नेमून वाहतूक नियमन केले तर ते सोयीचे पडेल.

२) आयुका गेट व जोशी गेट या बाजूने येणाऱ्या सर्वांसाठी दररोज पडताळणी करूनच आता यावे लागते त्याचा मानसिक त्रास सर्वांना होतो आहे. स्वयंचलित थांबा कित्येकदा कार्यान्वित नसतो. त्यामुळे पडताळणीसाठी वेळ लागतो. त्या ऐवजी जर वाहानांना पास चे प्रायोजन केले तर हा त्रास होणार नाही.

तरी आपण वाहतुकीच्या नियमनासाठी व्यवस्था करावी व हि वाहतूक कोंडी फोडावी हि आग्रहाची विनंती. कृपया आपण यात जातीने लक्ष घालून विद्यापीठीय प्राध्यापक,कर्मचारी, विद्यार्थी याची हि समस्या गांभीर्याने घ्याल व यावर मार्ग काढाल अशी अपेक्षा. तसेच विद्यापीठ प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी याच्या वाहनास स्टिकर्स किंवा पास ची व्यवस्था करावी हि विनंती. धन्यवाद.

अध्यक्ष,

[signature]

सावित्रीबाई फुले पुणे युनिवर्सिटी टीचर्स असोशिएशन

5491
30/08/2022
मा. कुलसचिव कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
पुणे - ४११ ००७.


Contact no.: 992129740, 9370245062 E-mail.: spputapune@gmail.com